जा.क्र. शिउसं/मान्य-३०१/स्वयंअशाळा/मान्यता/पुणे/२०१९-२०/६२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक :
0 3 JAN 2020

प्रति,
स्वर्गीय सुरजबाई किसनदास कटारिया स्मृती
सामाजिक सेवा प्रतिष्ठान, दौंड, जि.पुणे संचलित
स्वर्गीय सुरजबाई किसनदास कटारिया इंग्रजी माध्यमिक
शाळा काळेवाडी, ता.दौंड, जि.पुणे

विषय : सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत

संदर्भ : १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२ (सन २०१३ चा ०१)
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं. एसएफएस-२०१९/प्र.क्रं.१११३/एसएम-२ दिनांक ११ सप्टेंबर, २०१९

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय शासन पत्र क्रं. २ व ३ अन्वये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) स्वर्गीय सुरजबाई किसनदास कटारिया स्मृती सामाजिक सेवा प्रतिष्ठान दौंड, जि.पुणे संचलित स्वर्गीय सुरजबाई किसनदास कटारिया इंग्रजी माध्यमिक शाळा, काळेवाडी, ता.दौंड, जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.६ वी ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, राज्यमंडळ) अशी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पुर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात आली आहे.

अटी व शर्ती :-

१) संस्थेने सदर प्रस्तावित शाळा शासन मंजूरीपूर्वीच सुरु केली नसल्याची संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरु केली असल्यास संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी सदर शाळेकडून रुपये एक लक्ष इतका दंड वसूल करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा

२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे. :-

अ. व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिका-यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब. व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करुन या संदर्भीय शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.

४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस १) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व मार्गदर्शिकेचे पालन करणे बंधनकारक राहील. २) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

७) युडायस डाटा :- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना, "स्वंयअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमां प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबधीत संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता, "स्वंयअर्थसहाय्यित तत्तवावरील परवानगीप्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्धारावर लावणे आवश्यक राहील.

८) परवानगी दिलेल्या स्वंदअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणांप्रमाणे करावी.

(अनुराधा ओक)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१.

प्रत : माहिती व कार्यवाहीस्तव रवाना
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे



Scanned with OKEN Scanner